# शहाजहान कालीन स्थापत्य कला

**प्रविण श्री. राऊत** संशोधक विद्यार्थी, शासकिय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती

**प्रस्तावना :-**इ.स. च्या ८ व्या शतकापासून भारतावर मुसलमानाची आक्रमणे होत होती. प्रथम गझनी, घोरी यांनी भारतावर आक्रमण करुन भारताची आर्थिक प्रचंड लूट केली परंतु १२ व्या शतकाच्या प्रारंभी घोरीची आक्रमणे ही भारतात मुस्लीम सत्ता स्थापनेचा प्रसंग होय. मोगलांची सत्ता निर्माण होईपर्यंतचा काळ म्हणजे सुलतानशाहीचा काळ म्हणून संबोधल्या जातो. या काळात भारतात अनेक मुस्लीम राज्यकर्ते झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा भारतीय समाजावर उमटवलेला दिसतो. या परकीय सत्ताधिशाबरोबरच इस्लामी वास्तुकलेतील नवकल्पनाचे लोण ही भारतात येवून पोहचले इस्लामी वास्तुकला ही अरबी, सिरीयन, बाइझटाईन इराणी व तुर्की कलांच्या प्रभावातून आली आहे. दिल्लीचे मुगल सम्राट यांनी उभारलेल्या इमारतीचे तपशिलवार बांधकाम करण्याचे काम स्थानिक कारागीराकडे सोपविल्या खेरीज दुसरा मार्गच उपलब्ध नव्हता त्यामुळे प्रारंभापासूनच या नव्या शैलीकडे तुरकड स्वरुपात हिन्दू वास्तुकलेचा प्रभाव दिसून येतो. तथापी वास्तु संकल्पना मात्र निर्विवादपणे इस्लामी शैलीची आहे व ती हिंदू कलेहून भिन्न आहे. भारतात उभारल्या गेलेल्या इस्लामी वास्तुपैकी महत्वाच्या बहुतेक इमारती धार्मिक स्वरुपाच्या म्हणजेच मशीदी व कबरी आहेत. धर्मनिरपेक्ष वास्तुत राजप्रसाद व दरबाराची दालने यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

बाबराच्या भारत विजयानंतर (१५२६) भारतात मोगल साम्राज्यांचा प्रारंभ झाला तसेच स्थापत्य कलेच्या क्षेत्रात एका नवयुगाची सुरुवात झाली. अकबर, जहागिर, शहाजहानच्या काळात स्थापत्य कला आपल्या सर्वोच्च शिखरावर पोहचली. शहाजहानचा काळ तर स्थापत्य कलेचा सुवर्ण काळ होता. स्थापत्य कलेच्या विकासात मुगलांच्या दरबारी आश्रयाला असणाऱ्या समरकंद, इराणी, इटली आणि फ्रान्सच्या शिल्पकारांचा मोठा वाटा आहे. हेवेल म्हणतो- "मुगल स्थापत्य कला भारतीय स्थापत्यकलेच्या आदर्शाची पुनरावृत्ती आहे" भारतीय व विदेशी स्थापत्याच्या समन्वयाबद्दल फर्ग्युसन म्हणतो "स्वाभाविकता मोहकता यांची वैशिष्ट्ये आहेत" तर स्मिथ या कलेला "इंडो-पर्शियन आणि इंडोसारेनिक शैली" म्हणतो मुगलांनी मोठमोठ्या इमारती बरोबरच बगीच्यांची निर्मिती केली.

शहाजहान स्वत: स्थापत्य तज्ञ असून अनेक देशी विदेशी इतिहासकारांनी त्याच्या स्थापत्य प्रेमाची तारीफ केली आहे. एलफिस्टन म्हणतो, "त्याचे सर्वोत्तम वैभव त्यांच्या इमारतीव्दारा प्रदर्शित होते" इतिहासकार त्याला 'स्थापत्य सम्राट' (Prince of builder) संबोधतात शहाजहानची स्थापत्य शैली निव्वळ फारशी अथवा भारतीय नसून तिच्यात दोन्ही शैलीची सुंदर युती साधलेली आहे. अकबर व जहागीर प्रमाणे शहाजहानच्या इमारती भव्य, प्रचंड, कणखर आणि मर्दानी थाटाच्या दणकट पुरुषासारख्या नसून एखाद्या लावण्यवती, सालंकृत, कोमलवधु सारख्या आहेत. त्यांच्यात नटीचा नखरा नसून वधूचा सौजन्यशिल शृंगार आहे. वैभवशाली मनोहर मोहकता आहेत. शहाजहानने आपल्या इमारतीसाठी पांढऱ्या मार्बलचा उपयोग केला आहे. शहाजहानच्या इमारतीत सुंदर व सोनेरी रंगकाम आणि हिरे, मोती, सुवर्ण, चांदी वगैरे मौल्यवान धातूंची मनमोहक रत्नजडीत सजावट केलेली होती. अशी सजावट अकबर व जहागीरच्या इमारतीत आढळत नाही.

**शहाजहानने बांधलेल्या आग्रा येथील प्रसिध्द वास्तू :-**

**ताजमहाल :-** शहाजहानने आगऱ्याच्या दक्षिणेस मिर्झा राजा जयसिंह याच्याकडून जागा विकत घेवून आपली प्रिय पत्नी मुमताज महल हिच्या स्मरणार्थ ताजमहाल नावाची जग प्रसिध्द प्रेक्षणिय वास्तु उभारली. ताजमहाल जगातील पहिले आश्चर्य मानले जाते. तिचे श्वेत मार्बल, सुंदर खोदकाम व मनोहर जाळीदार नक्षिकाम अगदी अवर्णनीय आहे. ताजमहाल चे बांधकाम १६३१ पासून जानेवारी १६४३ पर्यंत चालले या काळात २० हजार कारागीर दररोज खपून ताजमहाल घडवित होते. उस्ताद इसा, अनामतखान शिराजी, उस्ताद पिरा वगैरे प्रमुख इंजिनिअर ताजमहालच्या बांधकामावर देखरेख करीत होते. ही इमारत बांधण्यात एकूण ५० लक्ष रुपये खर्च आहे. परंतु कासिम अली अफ्रिदी म्हणतो ९ कोटी १७ लक्ष रुपये खर्च झाले. शहाजहानने आपल्या प्रियतमेच्या या पवित्र स्थळासाठी मोफत जागा किंवा मजूर मुद्दाम मिळविले नाही.

ताजमहालच्या निर्मितीसाठी भारतीय हिंदू, मुस्लीम कारागीरा बरोबरच परकीय कारागीरांनाही पाचारण करण्यात आले होते. काही समालोचक ताजमहालला 'प्रेमाचे काव्य' म्हणतात. या इमारतीच्या बांधकामासाठी पांढरा संगमरवर वापरलेला आहे. फर्ग्युसन यांच्या मते, ताजमहाल या वास्तुत निसर्ग सौदर्य व कला सौदर्य यांचा अप्रतिम संगम आहे. डॉ. व्हि.ए. स्मिथ यांच्या मते, ताजमहाल वास्तू युरोप व आशियातील कारागीरांच्या गुणवत्तेचे सार आहे. यमुनेच्या काठावर आयाताकृती आवारात ताजमहाल बांधलेला आहे. आयाताची लहान बाजू यमुनेकडे आहे. उरलेल्या तिन्ही बाजू उंच भिंत बांधून बंदिस्त केलेल्या आहेत. यमुनेच्या बाजूस ताजमहाल उभा आहे. समोर भव्य कमानव्दार प्रवेश व्दार आहे. हे प्रवेशव्दार लाल दगडात बांधलेले असून त्याची रचना अशी आहे की, तिथे उभे राहील्यानंतर समोर पांढऱ्या शुभ्र संगमरवरातील ताजमहाल दिसावा. जणु ताजमहाल प्रवेशव्दाराच्या कमानदार महीरपीत बसविलेला आहे. मध्यभागी असलेल्या कमानीवर पांढऱ्या संगमरवरात काळ्या दगडाने कुराणातील वचने लपेटदार अक्षरात लिहलेली आहेत. या अक्षरांचा आकार असा आहे की, एवढी उंची असुनही वाचनाऱ्याला सर्व अक्षरे सारख्याच आकाराची दिसावीत प्रवेशव्दार आणि खुद्द ताजमहालावर पांढऱ्या संगमरवरावर काळ्या संगमरवराने जडावलेली ही अक्षरे आणि इतर नक्षिकाम असे नजाकतीने केलेले आहे की, ते दगडात नसून विनले आहे असे वाटते. प्रवेशव्दारापासून ताजमहालपर्यंत मुगल बागांचे वैशिष्ट्ये असलेले दोन लांब लचक पाण्याचे कालवे, कारंजी, दुतर्फा सुरुची झाडे आणि मधून जाणारा मार्ग व शेवटी परत कारंजी आहेत या बागेमुळे ताजमहालाचा मुळच्या सौंदर्यात अधिकच भर पडते. कबरीच्या दोन्ही बाजूस कुंपनाच्या भिंतीमध्ये दोन इमारती आहेत. पश्चिमेकडे मशीद आहे. आणि केवळ प्रवेशव्दार आणी मशीद यांची संगती साधावी म्हणून पुर्वेस एक इमारत बांधलेली आहे. दोन्ही इमारती लाल दगडामध्ये आहेत.

यमुनेच्या बाजूस २२ फुट उंचीच्या चबुतऱ्यावर प्रत्यक्ष कबर बांधलेली आहे. चबुतऱ्याच्या चारही कोपऱ्यावर चारमजली उंच इमारत आहेत. प्रत्येक मिनारच्यावर लहानसा घुमट आहे. सर्व मिळुन मिनारची उंची जमीनीपासुन १६२ फुट आहे. चबुतऱ्यावर मध्यभागी १८६ फुट लांबी रुंदीची चौरस कबर आहे. शहाजहानने ताजमहाल मुमताजची कबर म्हणून बांधला होता. पण शहाजहानच्या मृत्युनंतर त्याचेही तेथेच दफन करण्यात आले. दोन्ही मुळ कबरी चबुतऱ्यात आत खोलवर आहे. मुमताज महलची कबर मध्यभागी असून शहाजहानची आकाराने मोठी पण किंचीत बाजुला आहे. चबुतऱ्याच्या वरच्या पातळीवर मध्यभागी दोघांच्या कबरीची प्रतिकृती उभारलेली आहे. भोवती संगमरवरी जाळीदार पडदा आहे. भोवती संगमरवरी भिंती आणि वरती प्रचंड पांढरा शुभ्र संगमरवरी घुमट आहे. मुख्य घुमटाच्या भोवती लहान लहान घुमट आहे. दोन्ही कबरी मकबऱ्याच्या आतील भिंती, समोरचा भाग रंगीबेरंगी खड्यांच्या जवाडाने सजविलेला आहे. त्यातील पाने, फुले, भौमितीक आकृती, रंगसंगती अतिशय बहारदार आहे.

यमुनेच्या वळणावर बांधलेली ही कबर जागेची निवड आतिल इमारतीसाठी वापरलेला लाल दगड आणि खुद्द ताजमहालचा शुभ्र संगमरवर यांची साधलेली रंगसंगीती, प्रमाणबध्दता, उंच चबुतरा त्यावरील मिनार, मुख्य घुमट कपोला, बाग, कारंजी यांचे एकमेकांशी साधलेले प्रमाण त्यामुळे त्यास आलेली नजाकतता यामुळे ही देखणी इमारत जगभरात नावाजली आहे. वास्तु म्हणून ती सुंदर आहेच. पण त्याच बरोबर मुळ वास्तुच्या चारही बाजूनी संगमरवरात केलेले कोरीव काम अंतर्बाह्य असलेले जवाडाचे रंगीबेरंगी काम पांढऱ्या संगमरवरात काळ्या संगमरवराने जडवलेली लपेटदार कोरीव अक्षरे आणि कला कुसर, कबरी भोवतीअसलेल्या सुंदर संगमरवरी जाळ्या यामुळे या वास्तुला इतके सौंदर्य प्राप्त झालेली आहे की, ते जगातील एक आश्चर्य मानले जातेच पण कुणी त्यास संगमरवरात उमललेले फुल अशी उपमा दिली आहे.

डॉ. आर.सी. मुजुमदार म्हणतात, "ताजमहाल हा मुमताज महलच्या कबरीवर शहाजहानने बांधलेले शानदार स्मारक आहे. याच्या बांधकामासाठी ५० लाख रुपये खर्च झाले आहे हे स्मारक इतके देखणे आहे की, जगातील सात आश्चर्यांपैकी ते एक बनले आहे." हेवेल म्हणतो "ताजमहाल हे भारतीय स्त्रीचे देवतुल्य स्मारक आहे ही एक उंची आदर्श कल्पना आहे, की जे स्थापत्य कलेबरोबरच शिल्पकलेशी संबंधित आहे."

ताजमहालच्या स्थापत्य शैलीबद्दल विद्वानात मतभेद आहेत. काहींच्या मते ती काही नविन नाही. शेरशहाची कबर, हुमायुनचे थगडे, विजापूर स्मारक आणि राजपूत व गुजराती पध्दतीचे जाळीदार नक्षीकाम यांचा विशेष प्रभाव ताजमहालमध्ये पहावयास मिळतो. स्लिमनच्या मते, ऑस्टिन-डी-बोर्डेक्स हा फ्रेन्च ताजमहालचा मुख्य इंजिनिअर असून त्याला उस्ताद इसा असे म्हणत. पण यास विश्वासार्ह पुरावा नाही. एखादा तोतया इतिहासकार ताजमहाल हा राजपूत राजवाडा होता असा खोटा प्रचार करतो. त्याला काही लोक आश्रय देतात ही देशद्रोही प्रवृत्ती होय. खऱ्या इतिहास प्रेमी वाचकांनी अशा प्रचाराला बळी पडु नये कारण भारतात हिंदू-मुस्लिम गुण्यागोविंदाने नांदतात हे ह्या फुटपाड्या स्वार्थी

फितुरांना सहन होत नाही. अनेकदा हे लोक परदेशाचे हस्तक असतात. तरुणांनी असल्या गोष्टी सहन करु नये. ताजमहाल शहाजहाननेच बांधला यात तिळमात्र शंका नाही. किंवा त्याबद्दल वैष्यस्थ पाहण्याचे कारण नाही. तो भारतीय कारगीरांनेच बांधला आहे. ताजमहाल म्हणजे संगमरवरावरील साकार झालेले सुंदर स्वप्न होय. जगातील सर्व लोक ताजमहाल पाहुन आश्चर्याने थक्क होतात. प्रियतमेचे एवढे मोठे स्मारक जगात दुसरे नाही. भारतीय समाजात ताजमहाल म्हणजे केवळ मुस्लीम थगडे राहीले नसून ते पतीच्या प्रेमाचे व पवित्र प्रतिक बनले आहे. भारतातील सर्व जातीय हिंदू मुस्लीम स्त्रिया पतीची अपार प्रीती संपादन करण्यासाठी पतीप्रेत म्हणून ताजमहालचा आदर्श समोर ठेवतात आणि शहाजहान सारखी पतीकडून प्रेमाची अपेक्षा करतात. भारतात घराघरातून ताजमहालच्या प्रतिमा आढळतात. विवाहादी, शुभप्रसंगी ताजमहालची प्रतिमा सप्रेम भेट देण्यात येते.

आधुनिक काळात ताजमहाल ही हिंदू वास्तू आहे असे मत मांडले जाते. इतिहास संशोधक श्री. पु.ना. ओक यांनीही तेच मत मांडले आहे व मानसिंगाने ताजमहाल बांधला असे म्हणतात परंतु त्याच्या संशोधनात अनेक कच्चे दुवे असल्यामुळे हे मत वादग्रस्त ठरले आहे. डॉ. रामनाथ सारखे इतिहासकारही या मतास विरोध करतात व अनेक मुद्दे पुढे मांडून ताजमहाल हा शहाजहाननेच बांधला असे ठामपणे सांगतात.

**मोती मशीद :-** ही आग्रा किल्ल्यातील श्वेत मार्बलची दुसरी नेत्रदिपक वास्तू होय. ती १६४५ ते १६५३ या सात वर्षात बांधली असून तिला तीन लक्ष खर्च आला. शिल्पशास्त्राच्या दृष्टीने मोती मशीद ताजमहालपेक्षा सुंदर आहे. असे तज्ञ शिल्पशास्त्रज्ञ म्हणतात. मोती मशीद म्हणजे शहाजहान कालीन स्थापत्य कलेचा कळस होय. बनारसी प्रसाद म्हणतात "साधेपणाशी संयोग साधून सर्वोत्तम कलेच्या पुर्णत्वाचा तो एक नमुना आहे" मशीदीची लांबी २३६ फुट आणि रुंदी १८७ फुट आहे. मशीदीच्या चारही बाजुंनी सज्जे आहे ही मशीद शहाजहानची शेवटची कलाकृती होती.

**जामा मशीद :-** ही मशीद आग्रा किल्ल्यामागे शहाजहान कन्या जहान आरा हिने इ.स. १६४८ मध्ये बांधली. तिला पाच लाख रुपये खर्च आला. कौशल्यपूर्ण, उत्कृष्ट सफाईदारपणा आणि प्रमाणबध्दता ही या वास्तूची वैशिष्ट्ये सांगता येतील.

**दिवान-ए-आम :-** इ.स. १६२८ मध्ये या भवनाची निर्मिती झाली. या भवनाची लांबी २०१ फुट व रुंदी ६७ फुट होती. सभागृहाच्या मध्यभागी सम्राटाची बैठक व्यवस्था होती व ते सिंहासन संगमरवराचे होते. ह्या सिंहासनाच्या बाजुला बेगम साठी बैठक खोल्या होत्या. हे सभागृह शहाजहान बादशहाचा दरबार वाटत होते. कारण त्यात सर्व व्यक्तिंना प्रवेश होता.

**दिवान-ए-खास :-** हे संगमरवर सभागृह २२ फुट उंच असुन ६५ फुट लांब व ३४ फुट रुंद आहे. या सभागृहातील स्तंभावर अत्यंत सुंदर नक्षीकाम केले आहे व भिंतीवर वेल ब्युटी सोबतच फुल आणि पानांचे चित्र आहे.

**मुसम्मन बुर्ज :-** आग्रा किल्ल्यातील श्वेत मार्बलची ही सुंदर चार मजली इमारत नुरजहाँसाठी बांधली होती. पुढे तिथे मुमताजमहल राहत होती. ह्याच सुंदर वास्तूत शहाजहानने आपल्या प्रियतमेच्या ताजमहालकडे पाहत प्राण सोडला.

**खास महल :-** हा महल दिवान-ए-खास जवळ असून हा शहाजहान व त्याच्या पत्नीचे शयनगृह होते. या महालाचा आकार ७८ x ३२ फुट असून महल लाल दगडाने बनविला होता.

**शहाजहानने बांधलेल्या दिल्ली येथील प्रसिध्द वास्तू :-**

**लाल किल्ला :-** शहाजहानने १६३८ मध्ये दिल्लीला यमुना नदीच्या किनारी लाल किल्ला बांधला व त्या ठिकानाचे नाव 'शहाजनाबाद' ठेवले. किल्ला हा लाल दगडाने बनविला असल्याने त्याचे नामकरण 'लाल किल्ला' असे झाले. ३२०० फुट लांब १६५० फुट रुंद इतके विस्तृत क्षेत्रफळ या किल्ल्याचे आहे. आपल्या अनुपम सौंदर्याने भव्यतेने हा किल्ला जगात वेगळे स्थान ठेवतो. ह्या किल्ल्याचे प्रवेश व्दार वास्तूकलेच्या दृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण आहे हा किल्ला शहाजहानच्या वैभवाची चरण सिमा आहे. ह्या किल्ल्यामधील इमारती कलेच्या दृष्टीने अतिशय सुंदर आहे. त्यात दिवान-ए-आम, दिवान-ए-खास, रंगमहल, मोती महल, हिरा महल इत्यादी प्रसिध्द इमारती असून अनेक इतिहासकारांनी त्याची प्रशंसा केली आहे. प्रत्येक इमारती समोर सुंदर बगीचा असून जाळीदार नक्षीकाम व भिंती वरील चित्र सुंदर आहे. या इमारतीचे संक्षिप्त वर्णन खालीलप्रमाणे-

**दिवान-ए-खास :-** सर्व इमारतीमध्ये दिवाण-ए-खास ही इमारत सर्वाधिक अलंकृत आहे. या इमारतीच्या भिंतीवर अमीर खुसरोने फारसीत एक लेख लिहला आहे.

'गर फरदौस बर रुए जमी अस्त ।<br>
हमी अस्तो, हमी अस्तो, हमी अस्तो ।।<br>
अर्थात यदी पृथ्वीपर कही स्वर्ग है ।<br>
तो यही है, यही है, यही है ।।'

ही इमारत स्तंभावर उभी असून खुली इमारत आहे. ज्यामध्ये ९० x ३० फुट रुंद एक सभागृह आहे.

**दिवान-ए-आम :-** या सभागृहाची लांबी १८५ फुट व रुंदी ६० फुट आहे. शहाजहान या ठिकाणी सर्व सामान्य जनतेच्या समस्या ऐकत असे व त्यावर निर्णय देत असे. या इमारतीमधील दगडाची रचना अत्यंत आकर्षक आहे.

**रंगमहल :-** हा महल जनानखान्यातील महिलांसाठी बनविला होता हा महल मोगल वास्तुकलेचे सुंदर उदाहरण आहे.

**जामा मशीद :-** लाल किल्ल्या समोरील बनवलेली जामा मशीद अत्यंत विशाल आणि प्रभावशाली आहे. इ.स. १६४४ ते १६५८ च्या दरम्यान मशीदीची निर्मिती झाली. ही मशीद उंच चबुतऱ्यावर आहे. त्या ठिकाणी जाण्यासाठी पायऱ्या चढाव्या लागतात. मशीदीत प्रवेश करण्यासाठी तीन दरवाजे आहेत. पूर्वेकडील व्दार शाही परीवारासाठी असून ते अत्यंत प्रभावशाली आहे. उत्तर आणि दक्षिणेकडील प्रवेशव्दार सामान्य जनतेसाठी होती. मशीदीमध्ये काळ्या रेषांनीयुक्त संगमरवराचे तीन घुमट आहे. दोन मिनारे आणि मध्यभागी महराब आहे जे आपले लक्ष केंद्रीत करते. मध्यभागी महराबवर कुराणांची अक्षरे कोरली आहे.

**मयूर सिंहासन :- (तख्त-ए-तौस)** शहाजहानने बेबादलखान यांच्या देखरेखेखाली बारास्तंभी रत्नजडीत मयूरासन बनविले. त्यावर शहाजहानने पहीले पदारोहन १२ मार्च १६३५ रोजी केले. या सिंहासनास एक कोटी रुपये खर्च आला. आक्रमण नादीरशहाने ते पर्शियास नेले (१७३९) असून आज उपलब्ध नाही, मोडले आहे. त्याचे भानावशेष जोडून बनविलेले सिंहासन आज तेहरानच्या वस्तु संग्राहलयात आहे.

**अन्य इमारती :-** याशिवाय शहाजहान जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने इमारती बांधल्या ग्वाल्हेर, अजमेर, लाहोर, काश्मीर, अंबाला, फैजाबाद, काबूल कितीतरी शहरी त्याच्या उत्तामत्त वस्तू आहेत. त्याने दिल्ली, लाहोर, वगैरे नगरीत बागबगीचे लावले त्याच्या जवळ कोहीनुर सुध्दा होता.

**निष्कर्ष :-** शहाजहान काळात मोगल स्थापत्य कला परमोच्च शिखरावर होती. ताजमहाल, मोती मशीद, जामा मशीद, दिवान-ए-आम, दिवान-ए-खास या इमारती शहाजहानचा काळ हा मध्यकालीन स्थापत्यकलेचा 'सुवर्ण काळ' होता ह्याची साक्ष देतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) देशमुख मा.म., मध्ययुगीन भारताचा इतिहास-प्रकाशक- श्री.आर.बी. सिंह, विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर
२) मिश्र, प्राचिन व मध्यकालीन भारत, प्रकाशक-विश्व पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, महाल, नागपूर पे.नं. १९५, १९६.
३) महाजन व्ही.डी., मध्यकालीन भारत (१००० ई. ते १७६१ ई. तक) प्रकाशक-एस. चन्द एण्ड कंपनी लि. रामनगर, नई दिल्ली.
४) खन्ना कैलाश, मध्यकालीन भारत का इतिहास, प्रकाशक- अर्जून पब्लिशिंग हाऊस, दरियागंज, नई दिल्ली.
५) रोडे सोमनाथ, मध्ययुगीन भारताचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास प्रकाशक- मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशर्स, महाल, नागपूर.
६) भिडे गजानन, नलवाडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक) प्रकाशक-फडके प्रकाशन कोल्हापूर पे.नं. २८६, २८७, २८८.
७) शर्मा एल.पी., मध्यकालीन भारत, प्रकाशक : लक्ष्मी नारायण अग्रवाल, पुस्तक, प्रकाशक एवं विक्रेता संजय प्लेस, आगरा-२.